**वनपरिक्षेत्र अधिकारी,चंद्रपूर**
**यांचे कार्यालय**
दुरध्वनी क्रमांक. **०७१७२-२५२४३८**

**OFFICE OF THE**
**RANGE FOREST OFFICER,CHANDRAPUR**
**email -rforchanda@gmal.com**

**विषय**:- मानव वन्यजीव संघर्षामध्ये करावयाच्या उपाय योजना बाबत
**क्रमांक**:-वपअ/चंद्र/ **403**
**चंद्रपुर**,दिनांक **12/09/2017**

**प्रति,**
**विभागिय वनअधिकारी**
**चंद्रपुर वनविभाग, चंद्रपुर**

**संदर्भ**:-आपले कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-8/शिली-1/1566 चंद्रपुर,दिनांक 09/09/2017
**मार्फत:**-सहाय्यक वनसंरक्षक (संअ) चंद्रपुर वनविभाग चंद्रपुर

*******

विषयांकीत प्रकरर्णी सादर करण्यांत येते की, दिनांक **22/08/2017** रोजी चंद्रपुर परिक्षेत्रा अंतर्गत उपक्षेत्र दुर्गापुर मधील मसाळा तुकुम या गावात बिबटयाने हल्ला करुन एका इसमास जख्मी केले. तद्नंतर दिनांक **08/09/2017** रोजी सिनाळा या गावातील **श्री.प्रितम वसंत सहारे** या इसमावर बिबटयाने हल्ला करुन ठार केले.

सदरचे क्षेत्रात मोठया प्रमाणात **पदमापुर,दुर्गापुर,मसाळा,सिनाळा, खैरगांव, नवेगांव,कढोली, वढोली, भटाळी व विचोडा** सदरचे क्षेत्रात मोठया प्रमाणात अंदाजे **(3वाघ,8 बिबट)** यांचे अस्तित्व असल्याने भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. वारंवार होत असलेला मानव वन्यजीव संघर्षामुळे वनविभागा मार्फत ग्रामस्तरावर ग्रामसभा घेण्यांत येवुन त्यानां मानव वन्यप्राणी संघर्षामध्ये गावकऱ्यांची भुमिका त्यांना पटवुन देणे करिता मानव वन्यजीव रक्षक,वन्यजीव प्रेमी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन होणे आवश्यक असल्याने आपले स्तरावर ग्रामसभा आयोजीत करणे बाबतची कार्यवाही करावी. ज्यामुळे मानव वन्यजीव संघर्षाच्यावेळी गावकऱ्यांचे सहकार्य मिळेल व लोकप्रक्षोभणास शांत करता येईल. प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने दुर्गापुर उपक्षेत्रा अंतर्गत येणारे **पदमापुर,दुर्गापुर, मसाळा, सिनाळा, खैरगांव, नवेगांव, कढोली,वढोली,भटाळी व विचोडा** ग्रामपंचायतीसह वनविभागाच्या विद्यमानाने गावातील लोकांना मार्गदर्शन, उदभोदन व प्रबोधन करणे अत्यंत गरजेचे आहे.

विषयांकीत प्रकरर्णी आपले स्तरावर वर नमुद असलेल्या ग्रामपंचायती सोबत सभेचे आयोजन करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही होण्यांस विनंती आहे. याकार्यालया मार्फत सुरक्षेबाबत दक्ष असुन आपल्या वतीने घटना टाळण्याचा प्रयत्न सुरु आहे.

करीता माहीती व पुढील कार्यवाहीस सविनय सादर.

(संतोष थिपे)
वनपरिक्षेत्र अधिकारी
चंद्रपूर परिक्षेत्र चंद्रपूर

**प्रतिलिपी:**-सहाय्यक वनसंरक्षक(सं.अ) चंद्रपुर वनविभाग चंद्रपुर यांना माहिती व पुढिल कार्यवाहीस्तव सादर.
**प्रतिलिपी**:-क्षेत्र सहाय्यक दुर्गापुर यांना माहिती तथा पुढिल कार्यवाहीस अग्रेषित.

(संतोष थिपे)
वनपरिक्षेत्र अधिकारी
चंद्रपूर परिक्षेत्र चंद्रपूर